# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा
अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- १३३/२०२०**

**तक्रारकर्ता श्री. हितेंद्र देवीचंद गांधी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्र. सहाय्यक आयुक्त (आस्थापना)**
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय, दुसरा मजला,
जुने जकात घर, शाहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई -४०० ०२३.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक**
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय, दुसरा मजला,
जुने जकात घर, शाहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई -४०० ०२३.

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०७.१०.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

तक्रारकर्ता यांनी दि. १४.०२.२०२० रोजी आयोगास तक्रार केली की, जेव्हा दि. २५.१०.२०१९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहितीची मागणी केली होती तेव्हा जन माहिती अधिकारी यांनी काही माहिती दि. २२.११.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविली. जी माहिती त्यांच्याशी संबंधीत नव्हती त्यासाठी त्यांनी माहितीचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(३) अंतर्गत हस्तांतरीत केला नाही. याबाबत आयोगाने संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा मागितला. जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.१०.२०२० रोजी त्यांचा खुलासा आयोगास सादर केला.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी आयोगास सादर केले की, तक्रारकर्ता यांनी त्यांचे माहिती अर्जात ६ मुद्यांवर माहिती विचारली होती. त्यापैकी मुद्दा क्र. १, ४ व ६ ची माहिती कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध असल्याने तक्रारकर्त्यांना पुरविण्यात आली. परंतु, मुद्दा क्र. २ ची माहिती अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापुर यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्याने तसेच मुद्दा क्र. ३ अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भंडारा यांच्याशी संबंधीत असल्याने त्यांना तक्रारकर्ता यांना परस्पर पुरविण्याबाबत कळविण्यात आले होते.

तद्नंतर ॲड श्री. गांधी यांनी दि. २३.१२.२०१९ (या कार्यालयास प्राप्त दि. ०१.०१.२०२०) रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने दि. २१.०१.२०२० रोजी दुपारी ०१.०० वाजता सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतू प्रशासकीय कारणास्तव सदर सुनावणी झाली नसल्याने दि. ०४.०२.२०२० रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. त्यानुसार दि. ०४.०२.२०२० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी झाली. सुनावणीच्या वेळी अर्जदार (सध्याचे तक्रारदार) यांनी

..२/-

अपुरी माहिती मिळाल्याने अपील केल्याचे नमुद केले होते. त्यानुसार जी वैयक्तिक स्वरुपाची माहिती आहे ती वगळून इतर सर्व माहिती देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०३.०३.२०२० रोजी आदेशित केले. त्यानुसार सदर पत्र व माहिती अर्जदारास (सध्याचे तक्रारदार) नोंदणीकृत टपालाने विनामुल्य पुरविण्यात आलेले होते. असे असतांनाही अर्जदार (सध्याचे तक्रारदार) यांनी त्यांना अधिकृत हस्तांतर पत्राव्दारे कळविले नसल्याचे दि. २४.०९.२०२० रोजीच्या तक्रार अर्जामध्ये नमुद केले आहे. तसेच सदर माहितीच्या अनुषंगाने अर्जदार यांनी प्रथम अपिलीय अधिकारी, भंडारा यांच्याकडे प्रथम अपील अर्ज सादर केलेला असल्याचे दिसुन येते. असे असतांना देखील अर्जदार यांनी प्रथम अपील अर्ज करण्यास अडचणी येत असल्याचे दि.२४.०९.२०२० च्या तक्रार अर्जात नमुद केलेले आहे. यावरुन अर्जदार (सध्याचे तक्रारदार) मा. राज्य माहिती आयोगाची दिशाभुल करत असल्याचे दिसुन येत आहे.

केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम २००५ चा प्रमुख उद्देश प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने माहिती अधिकार अधिनियमामध्ये नमुद यथास्थिती नियमानुसार अर्जदारास त्यांनी मागितलेली माहिती देणे, हा आहे. सदरील नियमास अनुसरुन अर्जदारास (सध्याचे तक्रारदार) त्यांनी मागितलेली माहिती ही विहित मुदतीत देण्यात येऊन उर्वरित माहिती संबंधित अधीक्षक कार्यालयाला देण्याबाबत नियमानुसार कळविण्यात आले होते.

जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास सादर केले की, कार्यालय अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी व उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापुर यांनी परस्पर अनुक्रमे दि. २२.११.२०१९ व दि. ०९.१२.२०१९ अन्वये अपिलार्थींना (सध्याचे तक्रारदार) यांना माहिती दिलेली आहे.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ०८.१०.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

8-10-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**